26-03-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/25/2025 11:12 PM Page 1



## निवडक

### कला अकादमीच्या नृत्य विभागातर्फे २९ रोजी मासिक संगीत सभा

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २५ :** कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे शनिवार दि. २९ रोजी प्रतिभा या उपकमाअंतर्गत मासिक संगीत सभेचे आयोजन करण्यात येणार आहे. ही संगीत सभा कला अकादमीच्या कृष्णकक्षात होणार आहे. दुपारी ठीक ३.३० वाजता मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यकमाचे उद्घाटन करण्यात येईल व त्यानंतर संगीत विभागातील विद्यार्थ्यांचा शास्त्रीय गायन, वादन व नृत्याचा कार्यकम होईल. कार्यकमाची सुरवात भरतनाटयम् नृत्याने होणार आहे त्यामध्ये अनुश्री कोली, मुस्कान, कला नागा चैत्राली, अमिषा अडकोणकर, मंजु महाले–नाईक, रश्मी नावेलकर या विद्यार्थिनी आपली कला सादर करणार आहेत. त्यानंतर सदानंद झो यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. शास्त्रीय गायनानंतर तबला सहवादनाचा कार्यकम होणार आहे त्यामध्ये कामेश रेडकर, दिपतेज रेवोडकर व जीत सावंत हे विद्यार्थी आपली कला सादर करणार आहेत. त्यानंतर सिद्धी नाईक हिचे बासरीवादन होईल. बासरी वादनानंतर कला अकादमीच्या केपे संगीत केंद्रातील विद्यार्थिंनी नेहा नाईक, तुळशी वेळीप, श्रद्धा च्यारी व अंशिका राव यांचे शास्त्रीय गायन होईल. त्यानंतर विजय सावंत यांचे संवादिनी सोलो वादन होईल व कार्यकमाची सांगता तनया चोपडेकर पियु निमकर, गौरक्षा साळसकर, पुर्वा गावस व हर्षिता च्यारी यांच्या कथ्थक नृत्याने होणार आहे. सर्व विद्यार्थी कलाकारांना सुरज मोरजकर, भार्गवराम गर्दे, संतूर नाईक, प्रज्योत ताम्हणकर व राघव भट यांची तबलासाथ तर शैलेश गांवकर व चारुदत्त गावस यांची संवादिनी साथ लाभणार आहे. तसेच नृत्याच्या कार्यकमासाठी सिमा शिकेरकर यांची पढंतची साथ, डॉ. सपना नाईक यांची नटवंगमची साथ, डॉ. दिप्ता रुबसुंदरम यांची गायन साथ व चेथनमुर्ती डी. आर यांची मृदंगमची साथसंगत कलाकारांना लाभणार आहे. हा कार्यकम सर्व रसिक श्रोत्यांसाठी खुला असून मोठया संख्येने या कार्यकमास उपस्थित राहण्याचे आवाहन हिदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे करण्यात आले आहे.

### भूमिका देवी पर्येचा ३० रोजी वार्षिक न्हावण, रोमट उत्सव

टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २५ :** सप्तशती भूमिका देवी पर्येचा वार्षिक न्हावण व रोमट उत्सव परंपरेनुसार साजरा होणार आहे. त्यानिमित्त सकाळपासून धार्मिक व पारंपरिक कार्यक्रम दुपारी १ वाजता देवीचे न्हावण, संध्याकाळी ४ वाजता देवीची कलश मिरवणूक साखळी येथे जाणार त्याठिकाणी भाविकांना दर्शन, न्हावण व कौल दिल्यानंतर कलश रात्री १२ वाजण्याच्या सुमारास परत मंदिरात जाणार. तत्पूर्वी पर्ये येथील सर्व रोमटामेळ वाजत, गाजत व नाचत मंदिराकडे येईल. देवीच्या कलशासह श्री केळबाई देवीच्या प्रांगणात जागरणाची आल्यानंतर त्याठिकाणी नाट्यप्रयोग होईल.दुसऱ्या दिवशी देवीचा कलश श्री भूमिका मंदिरात आल्यानंतर त्याठिकाणी पुरोहितामार्फत नूतन वर्षाचे पंचांग वाचून कार्यक्रमाची सांगता होईल.

### खोलपेवाडी साळ येथे २७ रोजी असंसर्गजन्य रोग तपासणी शिबिराचे

टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. २५ :** खोलपेवाडी साळ येथे उपआरोग्य केंद्र – खोलपेवाडी व सामुदायिक आरोग्य केंद्र – डिचोली यांच्या संयुक्त विद्यमाने असंसर्गजन्य रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर गुरुवार दि. २७ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १२.३० वाजता या वेळेत श्री केळेश्वर मंदिर सभागृहात होणार आहे. या शिबिरात मधुमेह, उच्च रक्तदाब, कर्करोग निदान तपासणी सोबत सर्वसाधारण, आयुष, होमिओपॅथी, दात ही बाह्य रुग्ण तपासणी तसेच रक्तदाब तपासणी, रक्तातील साखरेचे प्रमाण तपासणी, हिमोग्लोबिन, गर्भाशय मुख कर्करोग तपासणी केली जाणार आहे. तरी खोलपेवाडी ग्रामस्थांनी या आरोग्य तपासणी शिबिरात उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आयोजकातर्फे कळविण्यात आले आहे.

### पंढरपूर वारीसाठी ३० पासून नोंदणी प्रक्रिया

टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २५ :** श्री कुळमाया (सायबीण), श्री सातेरी माता, श्री श्यामपुरुष, श्री रवळनाथ, श्री देव ब्राह्मण (पिंपळेश्वर) श्री तळेश्वर, श्री निरंकारी तसेच समस्त सर्वण गावातील देव देवतांच्या कृपाशीर्वादाने सर्वण वारकरी सांप्रदायातर्फे २० जूनपासून सर्वण, नृसिंहवाडी ते पंढरपूर अशी पायी वारी होणार असून याची नोंदणी प्रक्रिया रविवार दि. ३० मार्च (गुढीपाडवा) ते शनिवार दि. १२ एप्रिल (हनुमान जयंती) पर्यंत चालणार आहे. ज्यांना कोणाला या वारीत सहभागी व्हायचे आहे आणि कोणाला जर अर्थी मदत करायची असेल तर कार्याध्यक्ष पुंडलिक वसंत सावंत (९४२२४३९३३४) किंवा संयोजक सगुण शिवा सावंत (९५८८४०५४६६) यांच्याकडे संपर्क साधावा.



मोरजी : मोरजाई देवस्थान समिती निवड

### मोरजाई देवस्थानच्या अध्यक्षपदी रामनाथ वसंत शेटगावकर

टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २५ :** मोरजी येथील श्री मोरजाई देवस्थान समितीची आतापर्यंतच्या इतिहासात प्रथमच मतदान होऊन निवडणूक घेण्यात आली. या निवडणुकीत रामनाथ वसंत शेटगावकर यांनी मोरज जिल्हा पंचायत सदस्य सतीश शेटगावकर यांचा पराभव करत अध्यक्ष पदाची माळ आपल्या गळ्यात घालून घेतली. मोरजाई देवस्थान समितीची अध्यक्षपदी निवडणूक आतापर्यंतच्या इतिहासात प्रथमच मतदान होऊन करण्यात आली. या मतदानामध्ये सर्व महाजनांनी उत्स्फूर्तपणे सहभाग दर्शवला. ही निवडणूक शांततापूर्ण होण्यासाठी निवडणुकीच्या उपस्थितीला तीन मामलेदार पोलीस फोर्स फाटा उपस्थित होता. मागच्या महिन्यात राज्यभर देवस्थान समितीच्या निवडणुका घेण्यात आल्या होत्या. त्यावेळीही श्री मोरजाई देवस्थान समितीची निवडणूक घेण्यात आली होती. परंतु मावळत्या समितीने बेकायदेशीर निवडणूक प्रक्रिया सोपस्कार पूर्ण केल्यामुळे दुसऱ्या गटाने आक्षेप घेतला होता. आणि तशा प्रकारचा अहवाल मामलेदारांना पाठवण्यातही आला. त्यानंतर मामलेदार आणि पूर्वीची निवडणूक प्रक्रिया चुकीची असल्याने २३ रोजी महाजनांची सर्वसाधारण सभा घेऊन त्यामध्ये निवडणूक प्रक्रिया घेण्याची आदेश दिला होता.

त्यानुसार २३ रोजी मोरजाई मंदिर मंडपामध्ये महाजनांची सभा झाली. या सभेमध्ये अध्यक्ष पदासाठी जिल्हा पंचायत सदस्य सतीश शेटगावकर आणि रामनाथ वसंत शेटगावकर यांचे दोन अर्ज अध्यक्षपदासाठी आल्यामुळे मतदान पद्धतीने निवडणूक घेण्यात आली.

या निवडणुकीत रामनाथ वसंत शेटगावकर अध्यक्ष म्हणून विजयी झाले. तर प्रकाश काळू शेटगावकर बदली अध्यक्ष म्हणून निवडून आले. समिती खालील प्रमाणे –अध्यक्ष रामनाथ वसंत शेटगावकर बदली अध्यक्ष प्रकाश शेटगावकर, खजिनदार उत्तम शेटगावकर, सचिव सुनील शेटगावकर, मुख्यत्यार देऊ शेटगावकर यांची निवड आली. कळसोत्सव करण्यासाठी प्रयत्न करणार – नवनिर्वाचित समितीचे अध्यक्ष रामनाथ शेटगावकर व प्रकाश काळू शेटगावकर यांनी प्रतिक्रिया देताना सर्व महाजन आणि आमच्यावर विश्वास ठेवून शांततापूर्ण मतदान करत आम्हाला विजयी केल्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानत असताना भविष्यात मोरजाई देवीचा सुप्रसिद्ध कळसोत्सव साजरा करण्यासाठी पुढच्या वर्षी जोरात सुरुवात केली जाणार आहे. त्यासाठी सर्व महाजनांना विश्वासात घेऊन पुढील प्रक्रिया विधी देवपूजा कार्य पावसाळ्यानंतरही सुरू केले जाईल, असे प्रकाश शेटगावकर यांनी सांगितले.

# कलेच्या माध्यमातून नवीन कलाकार घडावेत

## आमदार प्रवीण आर्लेकर : पेडणे तालुका वेष भूषा स्पर्धा, हास्य दरबार मैफलीचे उद्घाटन

टीम दैनिक हेराल्ड



पेडणे : शिमगोत्सवाच्या वेशभूषा आणि हास्य जत्रा कार्यक्रमाचे उद्घाटन करताना आमदार प्रवीण आर्लेकर. सोबत नगराध्यक्ष मनोज हरमलकर व इतर ,कलाकाराचे गौरव करताना

**पेडणे, दि. २५ :** पेडणे मतदारसंघाच्या विकासाला प्राधान्य देण्याबरोबरच कला संस्कृतीचे ही जतन करणे आणि प्रेक्षकांच्या मागणीनुसार कला संस्कृतीच्या कार्यक्रमाची आयोजन करत असताना दिग्गज कलाकारांनी आपली कला सादर केल्यानंतर त्या कलाकारांना पाहून नवीन कलाकाराने आपली कला आत्मसात करावी. आणि नवीन कलाकार घडावेत यासाठी अशा कार्यक्रमाचे आयोजन केले जात असल्याचे प्रतिपादन पेडणे मतदार संघाचे आमदार प्रवीण आर्लेकर यांनी पेडणे तालुका शिमगोत्सव समितीमार्फत शासकीय पातळीवर दोन दिवस चाललेल्या शिमगोत्सवाच्या पेडणे तालुका वेष भूषा स्पर्धा आणि हास्य दरबाराच्या मैफलीचे उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते.

यावेळी हास्य जत्रा या मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे दिग्गज कलाकार सुप्रिया पाठारे, जुली जोगळेकर, पंढरीनाथ कांबळे, गौरव मोरे, आदेश तेलंग, पेडणे नगराध्यक्ष मनोज हरमलकर, उपनगराध्यक्ष उषा नागवेकर नगरसेविका आश्विनी अरविंद पालयेकर, नगरसेविका तृप्ती सावळ देसाई, नगरसेविका राखी कशालकर, नगरसेविका विशाखा गडेकर, नगरसेवक शिवराम तुकोजी, नगरसेवक विष्णू उर्फ बाप्पा साळगावकर, नगरसेवक तथा पेडणे भाजप मंडळ अध्यक्ष सिद्धेश पेडणेकर, माजी जिल्हा पंचायत सदस्य रमेश सावळ, विश्वास पालयेकर,वसंत नाईक, तोरसे सरपंच छाया शेट्ये, माजी सरपंच सूर्यकांत तोरस्कर, मोपा सरपंच सुबोध महाले, हॅलर्न सरपंच रामदास परब, इब्रामपूर सरपंच खडपकर, कासारवर्णे माजी सरपंच नवनाथ नाईक, हसापूर उपसरपंच रुचिरा मळीक, धारगळ माजी सरपंच भूषण उर्फ प्रदीप नाईक पंच स्वाती मालपेकर, कोरगाव माजी सरपंच स्वाती गवंडी प्रतीक्षा आरोलकर वजरी माजी सरपंच संगीता गावकर, गौरी जोशलकर, आदी उपस्थित होते.

मुख्याध्यापक राजू बोंद्रे, शिक्षक देवानंद गावडे व शिक्षक किशोर किनळेकर आदींनी सूत्रसंचालन केले. सुरुवातीला पेडणे तालुका मर्यादित दोन गटांमध्ये संवाद व्यतिरिक्त वेशभूषा स्पर्धेचे आयोजन केले होते. याला उदंड प्रतिसाद मिळाला.

आमदार प्रवीण आर्लेकर यांच्या उपस्थितीत या स्पर्धेचे आणि हास्य दरबाराच्या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

आमदार प्रवीण आर्लेकर यांच्या हस्ते प्रसिद्ध कलाकार सुप्रिया पाठारे, जुईली जोगळेकर, पंढरीनाथ कांबळे, गौरव मोरे, आदेश तेलंग या दिग्गज कलाकारांचा स्मृतीचिन्ह पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी आदेश तेलंग व जुईली जोगळेकर यांनी एकापेक्षा एक मराठी लोकप्रिय गाणी सादर करून उपस्थितांचे मनोरंजन केले. हास्य जत्रेमध्ये सुप्रिया पाठारे, पंढरीनाथ कांबळे आणि गौरव मोरे यांनी वेगवेगळ्या संवाद फेकीतून हास्य दरबारातून उपस्थितांची मनी जिंकलीच. शिवाय उपस्थित प्रेक्षकांमध्ये हास्याचा दरबारही फुलून गेला होता.



म्हापसा : पाककलेचे परिक्षण करताना अमिता नायक सलत्री. बाजूला इतर.

## आमोणकर विद्यामंदिरात पालकांसाठी पाककला स्पर्धा

टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २५ :** आमोणकर विद्यामंदिरात पालकांसाठी झाले स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पालक शिक्षक संघ, प्राथमिक विभागातर्फे पूर्व प्राथमिक तसेच इयत्ता पहिली, दुसरीच्या पालकांसाठी भरड धान्ये वापरून पाककला स्पर्धा तर इयत्ता तिसरी, चौथीच्या पालकांसाठी फुलांपासून वेणी तयार करणे स्पर्धा आयोजित केल्या होत्या.

यानिमित्त कलाकार अमिता सलत्री तसेच शाळेच्या पूर्व प्राथमिक विभागाच्या शिक्षिका श्रीमती अंजली कामत यांनी परीक्षणाचे काम पाहिले. स्पर्धेसाठी एकूण ५२ पालकांनी भाग घेतलेला होता. शाळेच्या मुख्याध्यापिका पूजा दळवी, शाळेच्या उपमुख्याध्यापिका झेना व्हिएगस तसेच पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष नवनाथ केरकर, उपाध्यक्ष विशांत कोरगावकर, इतर सभासद व पालकवर्ग उपस्थित होते. इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी पौष्टिक आहारावर आधारित गीत सादर केले. उपस्थित प्रमुख अतिथींच्या हस्ते दीप प्रज्वलन करून स्पर्धेची सुरुवात झाली. परीक्षक अमिता सलत्री यांनी स्पर्धक पालकांचे भरभरून कौतुक केले व स्पर्धेसाठी अजून आपण परिपूर्ण तयारी कशी करावी यावर योग्य ते विचार मांडले. शाळेच्या उपमुख्याध्यापिका झेना व्हियेगस यांनीही पालकांचे कौतुकपर विचार मांडले. दोन्ही स्पर्धेतील विजेत्यांना परीक्षकांच्या हस्ते प्रशस्तिपत्रक तसेच पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. संपूर्ण स्पर्धेचे सूत्रसंचलन शिक्षिका दीपाली नाईक यांनी केले. तसेच परीक्षकांचा परिचय शाळेच्या शिक्षिका पूजा ताटकर यांनी करून दिला. आभार प्रदर्शनाने स्पर्धा कार्यक्रमाची सांगता झाली.

# पणजी शिमगोत्सव समितीच्या स्पर्धांचा निकाल जाहीर

टीम दैनिक हेराल्ड



पणजी : शिमगोत्सव समितीच्या स्पर्धांचा निकाल जाहीर करताना शांताराम नाईक. सोबत मंगलदास नाईक, किशोर नार्वेकर, प्राचार्य शशिकांत सरदेसाई व इतर.

**पणजी, दि. २५ :** पणजी शिमगोत्सव समितीतर्फे शनिवारी पणजी राजधानीत काढलेल्या भव्य शोभायात्रेतील चित्ररथ, रोमटामेळ, लोकनृत्य व वेशभूषा स्पर्धेचा निकाल सोमवारी पत्रकार परिषदेत, समितीचे कार्यकारी अध्यक्ष मंगलदास नाईक, सचिव शांताराम नाईक, कार्यकारी सदस्य किशोर नार्वेकर व इतर सदस्यांच्या उपस्थितीत जाहीर करण्यात आला. चित्ररथ स्पर्धेतील ७५ हजार रुपयांचे प्रथम बक्षीस दुर्गाभाट फोंडा येथील त्रिवेणी कला संघाला, रोमटामेळ स्पर्धेतील ७५ हजार रुपयांचे प्रथम बक्षीस शिरोडा येथील श्री.मंडलेश्वर मानगरू शिगमोत्सव मंडळाला तर लोकनृत्य स्पर्धेतील २५ हजार रुपयांचे प्रथम बक्षीस सावईवेरेंचो सख्याहरी पथकाला प्राप्त झाले. वेशभूषा स्पर्धेतील मोठ्या गटातील २० हजाराचे प्रथम बक्षीस सिद्धेश मराठे याला तर छोट्या गटातील ५ हजाराचे प्रथम बक्षीस कियान नाईक याला प्राप्त झाले. चित्ररथ स्पर्धेतील व रोमटामेळ प्रथम तीन विजेत्यांना धेंपे ग्रुप ऑफ कंपनीज तर्फे अनुक्रमे १५,१० व १० हजाराची बक्षिसे अतिरिक्त बक्षिसे प्राप्त झाली आहेत.

दुसरे बक्षीस – महालक्ष्मी नागरिक समिती, बांदोडा, तृतीय – कुंभारजुवा नागरिक समिती, चौथे – श्री देव धाडेश्वर स्पोर्ट्स अँड कल्चरल क्लब, नेरूल, पाचवे – धाडसाखळ स्टार स्पोर्ट्स कल्चरल क्लब, खांडोळा . उत्तेजनार्थ – बाल गोपाल कला सांस्कृतिक मंडळ, चिंबल, कासवाडा नागरिक समिती, तळावली, आडपई युवक संघ, श्री. देव बोडगेश्वर युवक संघ, बस्तोडा, रासई युथ असोसिएशन, हनुमान युवक संघ, वेरे, रवळनाथ राष्ट्रोळी सातेरी युवक संघ मोयरा, श्रीकृष्ण हौशी मंडळ–मडगाव, काजरेश्वर मंडळ–कुचेली, श्री. सातेरी युवक मंडळ, कार्मिभाट–मेरशी, खोर्ली नागरिक समिती–तिसवाडी, शिवराय युवक मंडळ – सांगे, देवतेवाडा युवक मंडळ–कुडचडे, राखणेश्वर युवक संघ–बोरी, हर हर महादेव कलासंघ–पर्ये, श्री देव राष्ट्रोळी कला मंडळ–गिरी, म्हापसा, ताळगाव युथ बारभाट, श्री दामबाब प्रसन्न–मडगाव, थ्री किंग माशेल, श्री. शांतादुर्गा प्रसन्न–मडगाव.

रोमटामेळ स्पर्धा – दुसरे – अवेडेकर समाज बोरी, तिसरे – सुयोग शिगमोत्सव मंडळ, आडपई, चौथे – डोंगरी शिगमोत्सव समिती, पाचवे – कुडचडे काकोडा शिगमोत्सव मंडळ, उत्तेजनार्थ – स्वरसाई शिगमोत्सव मंडळ–म्हापसा, तोणयेश्वर शिगमोत्सव मंडळ–साखळी, खांडेपार शिगमोत्सव समिती, चंद्रेश्वर भूतनाथ शिगमोत्सव–केपे, शांतादुर्गा बोडगेश्वर मंडळ– बार्देश, हिंदवी स्वराज्य दिवाडी शिगमोत्सव समिती, श्री पाईकदेव शिगमोत्सव समिती– सांगे, शांतादुर्गा लक्ष्मी नरसिंह साखल्यो संस्थान–सांकवाळे, श्रीराम विश्वकर्मा शिगमोत्सव समिती, श्री शांतादुर्गा बाबरेश्वर युवक संघ–कळंगुट.


लोकनृत्य स्पर्धा – दुसरे– सरस्वती कला मंडळ केळबाई– कुर्टी फोंडा, तिसरे – विजया कला मंडळ– कुर्टी, चौथे – टिटो स्पोर्ट्स अँड कल्चरल क्लब – पैंगीण, पाचवे – शांतादुर्गा शिवरंजनी कला संघ – कुर्टी, उत्तेजनार्थ, नवदुर्गा कला आणि सांस्कृतिक मंडळ – मडकई, परशुराम कला संघ – काणकोण, नवदुर्गा कला क्रीडा संघ, काणकोण, श्री घडवंश लोकमांड – केरी, सत्तरी, आदिपुरुष काणकोण, शिक्षा व्हिजन लेझियम ग्रुप – डिचोली.

वेशभूषा स्पर्धा – मोठा गट : दुसरे – धनंजय नाईक, तिसरे–रुद्राज नाईक, चौथे – जीविका नाईक, पाचवे – संजय के. नाईक, उत्तेजनार्थ – वैभव देसाई, शिवा नाईक, संदिप मयेकर, माया साळगावकर, सुरेखा किनळेकर, रामचंद्र गवाणकर, शंकरनाथ पारवडकर, सोहम मडकईकर, यादव गावडे, रामा खांडेपारकर छोटा गट – दुसरे – मयुरी कोरगावकर, तिसरे – तनुश्री वाडीकर, चौथे – श्रेयन उदयकर, दियांश पेडणेकर, उत्तेजनार्थ–ओजस मेस्ता, वेद सातार्डेकर, सान्विका कुमार, रिधांत रेडकर, विवान महाले, अनैशा पांगम, चारुही मसुरकर, तेजल गावस, अंश पाटील, राजवी राजू बोरकर.

# दिल्लीचा लखनौवर एका विकेटने दणदणीत विजय

## आशुतोष शर्मा, विपराजच्या खेळीने उत्कृष्ट भागीदारी रचली

**विशाखापटनम्, दि. २५ :**



आशुतोष शर्माच्या विस्फोटक खेळीच्या जोरावर दिल्ली कॅपिटल्सने लखनौ सुपर जायंट्स संघावर एका विकेटने दणदणीत विजय मिळवला आहे. आशुतोष शर्मा आणि विपराजच्या खेळीने लखनौच्या मोठ्या धावसंख्येला आव्हान देत उत्कृष्ट भागीदारी रचली आणि संघाच्या विजयाचा पाया रचला. दिल्ली कॅपिटल्सने सुरूवातीला ६ विकेट्स गमावले असतानाही लखनौवर एका विकेटने विजय मिळवला आहे.

डोंगराएवढ्या लक्ष्याचा पाठलाग करताना विशाखापट्टणम इथे झालेल्या लढतीत दिल्लीने शरणागतीच पत्करली होती. मात्र आशुतोष शर्माच्या अविश्वसनीय खेळीच्या जोरावर दिल्लीने थरारक विजय साकारला. २१० धावांचा पाठलाग करणाऱ्या दिल्लीची अवस्था ६५/५ अशी होती. ट्रिस्टन स्टब्स आणि विपराज निगम यांनी पाया रचला. यानंतर आशुतोष शर्माने ३१ चेंडूत ५ चौकार आणि ५ षटकारांसह नाबाद ६६ धावांची तडाखेबंद खेळी साकारली.

लखनौने मिचेल मार्श आणि निकोलस पूरन यांच्या वेगवान अर्धशतकी खेळींच्या बळावर २०९ धावांचा डोंगर उभारला होता. मार्शने ३६ चेंडूत ६ चौकार आणि ६ षटकारांसह ३६ चेंडूत ७२ धावा चोपून काढल्या. पूरनने ३० चेंडूत ६ चौकार आणि ७ षटकारांसह ७५ धावा कुटल्या. या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ४२ चेंडूत ८७ धावांची भागीदारी रचली. ही भागादारी फुटल्यानंतर लखनौचा वेग मंदावला.

लखनौचा नवा कर्णधार ऋषभ पंत ६ चेंडूत भोपळाही न फोडता तंबूत परतला. डेव्हिड मिलरने २७ धावा केल्या आणि त्याच्या अखेरच्या दोन चेंडूवरील षटकारामुळे लखनौनं दोनशेची वेस ओलांडली. दिल्लीकडून कुलदीप यादवने ४ षटकात अवघ्या २० धावा देत २ विकेट्स पटकावल्या. मिचेल स्टार्कने ३ विकेट्स घेतल्या.

प्रत्युतरादाखल खेळताना शार्दूल ठाकूरच्या पहिल्याच स्पेलमध्ये जेक फ्रेझर मॅकगर्क आणि अभिषेक पोरेल तंबूत परतले. समीर रिझवी सिद्धार्थची शिकार ठरला. अनुभवी फाफ डू प्लेसिसने २९ धावा केल्या. पण रवी बिश्नोईने त्याची खेळी संपुष्टात आणली. नवोदित दिग्वेश राठीने दिल्लीचा कर्णधार अक्षर पटलेला माघारी धाडलं.

निम्मा संघ तंबूत परतलेला असताना ट्रिस्टन स्टब्स आणि विपराज निगम यांनी ३५ चेंडूत ४८ धावांची भागीदारी केली. स्टब्ज बाद झाल्यानंतर सामन्याचे पारडं लखनौच्या दिशेने झुकले. पण आशुतोष शर्माने मैदानात उतरताक्षणीच चौकार, षटकारांची लयलूट सुरू केली. धावगतीचं आव्हान १२च्या पल्याड गेलेलं असताना आशुतोष–विपराज जोडीने २२ चेंडूत ५५ धावा कुटल्या.

मोक्याच्या क्षणी राठीने विपराजला बाद केले. त्याने १५ चेंडूत ३९ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. त्यानंतर मिचेल स्टार्क आणि कुलदीप यादवही बाद झाले. पण आशुतोषने हार मानली नाही. कुलदीप बाद झाल्यावर आशुतोषने चौकार–षटकार लगावले. शेवटच्या षटकात दिल्लीला ६ चेंडूत ६ धावा हव्या होत्या. शाहबाझ अहमदचा पहिला चेंडू निर्धाव पडला. दुसऱ्या चेंडूवर मोहित शर्माने एक धाव काढली. तिसऱ्या चेंडूवर आशुतोषने विजयी षटकार लगावत दिल्लीच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. ऋषभ पंतने सोडलेला एक झेल आणि स्टम्पिंग लखनौला चांगलंच महागात पडलं.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २०३ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 203 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .